# प्रेस नोट

## दिनांक ०२/०२/२०२१

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचे नाव | ॲन्टी करप्शन ब्युरो अमरावती घटक |
| २ | आरोपीचे नाव, हुददा, वर्ग व कार्यालयाचा पत्ता | १) श्री. नंदु परसरामजी मानकर, वय ४५ वर्ष, पद—वरिष्ठ तंत्रज्ञ, नेमणूक — महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी, तिवसा — १, ता.तिवसा जि.अमरावती. (वर्ग—४)<br>२) श्री. वैभव मारोतराव चिंचखेडे, वय २५ वर्ष, पद—बाहयस्त्रोत कर्मचारी, नेमणूक — महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी, तिवसा — १, ता.तिवसा जि.अमरावती. (कंत्राटी कर्मचारी) |
| ३ | अपराध घडला तारीख व वेळ | ०२/०२/२०२१ चे १२:०७ ते १२:२१ वा. दरम्यान |
| ४ | मागणी केलेली लाच रक्कम | ३,०००/— रुपये |
| ५ | पडताळणी दरम्यान तडजोडीअंती मागणी केलेली लाच रक्कम | २,०००/—रु. |
| ५ | स्विकारलेली लाच रक्कम | २,०००/— रुपये आरोपी क्र.२ यांनी |
| ६ | घटनास्थळ | महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी, तिवसा — १, शहर कार्यालय ता.तिवसा जि.अमरावती. |

**थोडक्यात हकिकत** : यातील तक्रारदार यांचे हॉटेल असून त्यांनी दि.०१/०२/२०२१ रोजी दिलेल्या तक्रारी च्या अनुषंगाने दि.०१/०२/२०२१ रोजी पडताळणी कारवाई दरम्यान महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी, तिवसा — १ येथील वरिष्ठ तंत्रज्ञ श्री. नंदु मानकर व बाहयस्त्रोत कर्मचारी श्री.वैभव चिंचखेडे यांनी तक्रारदार यांना हॉटेल तुळजाई मध्ये बसवलेले इलेक्ट्रीक मिटरचे बिल व्यवसायीक दराने बसवले पासुन न लावता चालु महिन्यापासुन लावण्याकरीता आरोपी यांनी तक्रारदार यांना ३,०००/— लाचेची मागणी करून तडजोडीअंती २,०००/— रूपये लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केले. तसेच आज दि. ०२/०२/२०२१ रोजी आयोजीत सापळा कार्यवाही दरम्यान आरोपी क्र.२ यांनी पंचासमक्ष तक्रारदार यांचे कडुन २,०००/— रूपये लाच रक्कम स्विकारल्याने रंगेहात पकडण्यात आले आहे. तसेच दोन्ही आरोपीनां ताब्यात घेण्यात आले असून गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदरची कार्यवाही ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र अमरावती चे मा.पोलीस अधिक्षक, श्री. विशाल गायकवाड, अप्पर पोलीस अधिक्षक श्री.अरूण सावंत, पोलीस उपअधिक्षक श्री.गजानन पडघन यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक रविंद्र जेधे, नापोकॉ.प्रमोद धानोरकर, पोकॉ. श्री.पंकज बोरसे, श्री.शैलेश कडू, श्री.राजेश कोचे, श्री.सुनिल जायभाये तसेच चालक सपोउपनि सतिश किटुकले यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

ॲन्टी करप्शन ब्युरो अमरावती विभागातर्फे सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी किंवा त्यांच्या वतीने खाजगी इसमाने त्यांचे कोणतेही शासकीय काम करुन देण्यासाठी लाचेची मागणी केल्यास तात्काळ ॲन्टी करप्शन ब्युरो अमरावती विभागाशी संपर्क साधावा

संपर्क :— ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती ललीत सेंटर, परांजपे कॉलनी, अमरावती टोल फ्री क्र. — १०६४, दुरध्वनी क्रमांक ०७२१ — २५५२३५५, २५५३०५५.

पोलीस उप-अधीक्षक कार्यालय
सत्यमेव जयते
ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती

(रविंद्र जेधे)
पोलीस निरीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो अमरावती

Scanned with CamScanner